# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२

## (सकाळी ११-०० ते ११-४५ वाजेपर्यंत)

**(गुरुवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री अंबादास दानवे**, अमरनाथ राजूरकर, ॲड.अनिल परब, सर्वश्री नरेंद्र दराडे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, आमश्या पाडवी, विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री सतीश चव्हाण, विलास पोतनीस, सतेज उर्फ बंटी पाटील, सुनिल शिंदे, दुष्यंत चतुर्वेदी, अशोक उर्फ भाई जगताप, सचिन अहिर, अनिकेत तटकरे, मोहनराव कदम, अमोल मिटकरी, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री अरुण लाड, जयंत आसगावकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"सन २०२२ च्या माहे जुलै-ऑगस्ट महिन्यात प्रामुख्याने विदर्भ व मराठवाड्यासह राज्यातील इतर भागात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली असून जिरायती व बागायती पिकांचे, घरांचे, पशुधनाचे नुकसान झाले असणे तसेच सुमारे १२५ पेक्षा जास्त लोकांना आपल्या प्राणास मुकावे लागले असणे, विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ तसेच मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली व बीड आदी जिल्ह्यात सर्व पिके वाहून, कुजुन व सडून गेलेली असणे, सोयाबीन, कापूस व तूर सारख्या नगदी पिकांचे तसेच नगदी पिकांबरोबरच केळी, संत्रा व तत्सम फळपिकांचेही नुकसान झालेले असणे, राज्यातील काही भागात, विशेषत: बीड, उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यात सोयाबीन पिकावर गोगलगायीचा व हळदया (यलो मोझाक) प्रादुर्भाव झाला असून शासनाकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना न झाल्यामुळे सोयाबीन उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असणे, पीक नुकसानी बरोबरच हजारो ठिबक व तुषार सिंचन संच वाहून गेले असून त्यात मातीचा गाळ जाऊन ते नादुरुस्त झालेले असणे, शासन निर्णयानुसार पुढील ७ वर्ष नवीन संच बसविण्यास अनुदान देय नसल्यामुळे शासनाने सदरची अट शिथिल करण्याची आवश्यकता असणे, अतिवृष्टीत राज्यातील हजारो हेक्टर शेतजमीन वाहून व खरडून गेल्याने त्या पुर्णपणे नापीक होण्याची भीती निर्माण झाली असणे, अनेक विहिरी गाळाने भरुन नादुरुस्त झाल्या असणे, मोठे ओढे व नदी नाले यांनी आपली पात्रे बदलल्याने काठावरील सुपीक जमीन नापीक झाली असणे, सततच्या व

अग्रिम प्रत

मोठ्या प्रमाणावर झालेल्या पावसाने काही जिल्ह्यातील पुलांचे तसेच पांदण रस्ते, ग्रामीण व प्रमुख जिल्हा मार्ग मोठ्या प्रमाणावर नादुरुस्त झाले असून मोठ्या खड्ड्यांमुळे अपघाताला सामोरे जावे लागत आहे व अनेक गावे अजुनही तालुक्याच्या प्रमुख गावाच्या संपर्कात आलेली नसणे, अनेक गावात विजेचे खांब अद्यापही पडलेले आहेत आणि ट्रान्सफॉर्मर व विद्युत वाहिन्या नादुरुस्त होऊन वीज वितरण व्यवस्था पुर्णत: कोलमडलेली असणे, परिणामी अनेक गावात अद्यापही वीज नसणे, पुराचे पाणी घरात शिरल्याने घरांची, गोठ्यांची, दुकानांची, टपऱ्यांची मोठया प्रमाणावर पडझड होऊन संबंधितांचे नुकसान झाले असणे, बराच काळ पाणी घरात राहिल्याने काही घरे पुर्णपणे ढासळलेली असून गाई-गुरांसह इतर पशुधन पाण्यामध्ये वाहून गेलेले असणे, मजुरांना या सर्व काळात व पुढील काही काळ मजुरी मिळणार नसल्यामुळे विशेष बाब म्हणून मजुरांना त्यांच्या झालेल्या नुकसानीसाठी आर्थिक मदत करण्याची आवश्यकता असणे, शासनाने तातडीने लक्ष न दिल्याने नाउमेद होऊन अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असणे, अनेक भागातील धरणे पूर्ण क्षमतेने भरुन ओसंडून वाहत असून पूरपरिस्थिती निर्माण झाली असणे, परिणामी या भागातील ठिकाणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, जलसंपदा विभागाने आताच पूर परिस्थिती नियंत्रणाचे नियोजन करणे आवश्यक असणे, तसेच कोकणामध्ये ऐन लावणी करण्याच्या वेळी जवळपास १५ दिवस पाऊस नसल्याने भात व नागली पिकाची रोपे सुकून जाणे, तर महाराष्ट्रातील काही भागामध्ये पर्जन्यमान कमी असल्याने झालेली पिकांची हानी व संभाव्य पाणीटंचाई निर्माण होणे, एकंदरीतच विदर्भ, मराठवाडा व इतर विभागातील अतिवृष्टीमुळे पिके, फळपिके, शेतजमीनी, रस्ते, विजव्यवस्था, घरे यांच्या नुकसानीसाठी शासनाने जाहीर केलेली मदत अत्यंत तुटपुंजी असून अनेक घटकांचा त्यात समावेश झालेला नसणे, अतिवृष्टी भागात अद्यापही रु.५० हजार सानुग्रह अनुदानाचे वाटप न करणे, शासनाने कोरडवाहूसाठी हेक्टर ७५ हजार रुपये तसेच फळपिकांसाठी हेक्टरी दीड लाख रुपयांचे तसेच सर्व घटकांचा समावेश करुन त्यांना ठोस मदत जाहीर करण्याची आवश्यक असणे, शेतकऱ्यांनी खरीप हंगामाकरीता पीक कर्ज घेतलेले असून अतिवृष्टीमुळे कर्ज परतफेड करणे त्यांना शक्य नसणे, या हंगामासाठी घेतलेल्या कर्जाची माफी करण्याची लोकप्रतिनिधींची व शेतकऱ्यांचीही आग्रही मागणी असणे, तथापि, शासनाकडून याबाबत दुर्लक्ष होत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र नाराजी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अप्रकाशित प्रत

असुधारित प्रत

**(दुपारी १२.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(क) तारांकित प्रश्न.**

**(ख) बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) उप मुख्यमंत्री** : "श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचा सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षांचा लेखापरिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) वस्त्रोद्योग मंत्री** : "महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उद्योग मंत्री** :

**(क)** "पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "कोंकण विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(४) महिला व बालविकास मंत्री** : "महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सेहेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री.अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाच्या २९ प्रमुख विभागांमध्ये सरळसेवा व पदोन्नतीच्या मिळून तब्बल दोन लाख १९३ जागा रिक्त असून त्यात तब्बल ४६ हजार ९६२ जागा जिल्हा परिषदांमधील असणे, रिक्त पदांमुळे नागरिकांना मिळणाऱ्या शासकीय सेवा प्रभावित होत असून तहसिल कार्यालयात साध्या उत्पन्नाच्या दाखल्यासाठीही विद्यार्थी व पालकांना किमान दोन आठवडे प्रतिक्षा करावी लागत असणे, राज्यात बेरोजगारी प्रचंड वाढली असून तरुणांना नोकऱ्यांची प्रतिक्षा असल्यामुळे मात्र शासनाच्या नव्या नोकरभरतीऐवजी आऊटसोर्सिंग, कंत्राटी पध्दतीवर अधिक जोर असल्याचे दिसून येणे, त्यातूनच निवृत्तांना पुन्हा कंत्राटी तत्वावर सेवेत सामावून घेतले जात असणे, सदरची माहिती ही फक्त राज्यातील शासकीय विभागांची व जिल्हा परिषदांमधील अधिकारी/कर्मचारी यासंदर्भातील असणे, तथापि त्यामध्ये नगरपंचायती, नगरपरिषदा, महानगरपालिका, शासन अधिनस्थ मंडळे व महामंडळे, उद्योग व इतर विभागातील माहिती समाविष्ट केली नसल्याचे निदर्शनास येणे, सरळसेवा भरतीबाबतही राज्य लोकसेवा आयोगाची संथगती दिसून येत असल्यामुळे साहजिकच कॉललेटर, प्रशिक्षण, परिवीक्षाधीन कालावधी याला बराच वेळ लागत असणे, राज्यातील बेरोजगारांची वाढलेली संख्या विचारांत घेतां, शासनाने नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करणे गरजेचे असणे व त्यासाठी शासनस्तरावर रिक्त असलेली पदे भरण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची वा केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"२०११ च्या जनगणनेनुसार पंढरपूरची लोकसंख्या ९९ हजार तर उपनगरी भागाची लोकसंख्या १० हजाराहून अधिक असणे, तसेच विठ्ठलाच्या दर्शनासाठी दररोज येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता शहरातील सांडपाण्यावर दैनंदिन प्रक्रिया करणारा १५ MLD क्षमतेचा प्रकल्प वाढत्या लोकसंख्येला अपुरा ठरत असणे, परिणामी दररोज लाखो लिटर्स सांडपाणी, प्रक्रिया न करताच थेट चंद्रभागा नदीत जाऊन मिसळत असणे, सद्या शहरात दररोज १३ ते १४ MLD सांडपाणी वापरून सोडले जात असणे, शनिवार, रविवार, एकादशीच्या दिवशी हेच सांडपाणी १५ ते

अप्रकाशित प्रत

१८ MLD पर्यंत वाढत असणे, अशावेळी हे सांडपाणी प्रक्रिया न करताच पुष्पावती नदी (गोपाळपूर) आणि मलपे ओढा (इसबावी) येथून थेट चंद्रभागा नदीला जाऊन मिळत असणे, या सांडपाण्यावरील प्रक्रियेसाठी शहरातील जुन्या पाईप लाईन बदलणे, ३ ठिकाणी पंपहाऊस उभा करणे, प्रत्येकी ५ MLD पाणी प्रक्रियेचे २ प्रकल्प उभा करणे, यासाठी ७७ कोटी रुपयांची गरज असणे, पंढरपूर नगरपालिकेची मुदत संपल्याने त्यावर प्रशासक असणे, परिणामी सांडपाणी प्रक्रियेचा ७७ कोटींचा प्रस्ताव नगर विकास खात्याकडे पाठविण्यात आलेला नसणे, परिणामी दररोज लाखो लिटर मैला मिश्रित सांडपाणी थेट चंद्रभागेत मिसळून पंढरपूर शहर व उपनगरांना दुषित पाण्याचा पुरवठा होणे याकडे प्रदुषण नियंत्रण मंडळाचे साफ दुर्लक्ष असणे, त्यातून स्थानिक लोक व वारकरी विविध आजारांना बळी पडणे, यामुळे पंढरपूरवाशिय व वारकरी यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, यामुळे पंढरपूर शहरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आराखडयास गती देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(३)** **सर्वश्री अंबादास दानवे,** आमश्या पाडवी, दुष्यंत चतुर्वेदी, शशिकांत शिंदे, अमरनाथ राजूरकर, सतिश चव्हाण, विक्रम काळे, अमोल मिटकरी, सचिन अहिर, सुनिल शिंदे, विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग मृत्यूचा सापळा बनत असल्याची बाब माहे ऑगस्ट २०२२ रोजीच्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, दिनांक १४ ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या भीषण अपघातात शिवसंग्राम संघटनेचे अध्यक्ष तथा माजी आमदार यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याने या महामार्गाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर येणे, मुंबई - पुणे महामार्गावरील अपघात आणि ते रोखण्यासाठी करण्यात येत असलेले प्रयत्न आदी मुद्दे ऐरणीवर येणे, पुणे-मुंबई एक्स्प्रेस-वेवर (द्रुतगती मार्ग) गेल्या दीड वर्षात तीनशे अपघातांमध्ये १२५ प्रवाशांचा मृत्यू झाला असणे, तर २११ जण गंभीर जखमी झाले असणे,सन २०२२ च्या ऑगस्ट महिन्यांपर्यंत ३० अपघात घडून ४० जणांचा मृत्यू झालेला असणे, वाहनांसाठी घाट परिसरात प्रतितास ५० कि.मी. तर अन्य ठिकाणी प्रति तास १०० कि.मी. वेगमर्यादा निश्चित केलेली असताना वाहनचालकांकडून वेगमर्यादेचे पालन करण्यात येत नसणे, सीटबेल्ट न लावणे असे अनेक प्रकार या द्रुतगती मार्गावर दिसून येणे, त्याचप्रमाणे अपघात झाल्यास तातडीने ॲम्ब्युलन्स सेवा उपलब्ध होत नसल्याने अपघातग्रस्तांना त्वरीत उपचार मिळत नसल्याने मृत्यू संख्येत होत

अमुद्रित प्रत

असलेली वाढ,परिणामी भरधाव वेगामुळे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने मोठ्या प्रमाणावर अपघात या महामार्गावर अपघात नेहमीच होते असणे, वेग मर्यादेचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांकडून कारवाई करण्यात येत असली, तरी वाहनचालक कारवाईस जुमानत नसणे, याव्यतिरिक्त निरनिराळ्या प्रकारच्या वाहनांना आखून दिलेल्या मार्गिकांचा वापर न करता वाहने बेदरकारपणे चालविण्यात येणे, हे हि वाढत्या अपघाताचे मुख्य कारण असणे, त्यामुळे देशातला पहिला एक्स्प्रेस हायवे अशी ओळख असलेल्या या महामार्गावरून प्रवाशांना जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागणे, परिणामी या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशी आणि वाहनचालकांत पसरलेले भीतीचे साम्राज्य, यास्तव मुंबई – पुणे महामार्गावरील वाढते अपघात रोखण्यासाठी तसेच महामार्गावर ठराविक अंतरावर ट्रॉमा केअर केंद्र उभारण्याबाबत शासनाने तातडीने हाती घ्यावयाच्या उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(४) **डॉ.मनिषा कायंदे**, सर्वश्री अरुण लाड, अमरनाथ राजूरकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात ऑनलाईनच्या माध्यमातून सायबर गुन्हात झालेली वाढ, गेल्या पाच महिन्यांत राज्यात नोंदविलेल्या सायबर गुन्हयांची आकडेवारी पाहता ऑनलाईन बँकिंग फसवणुकीचे गुन्हे प्रथम क्रमांकावर असणे, केवायसी अपडेट, ओटीपी, कर्ज मिळवून देण्याची बतावणी अशा कोणत्या ना कोणत्या प्रकारे बँकिंगशी संबंधित फसवणूक केली जात असणे, सायबर पोलीस ठाण्यात गुन्ह्यांची संख्या वाढत चाललेली असताना मुंबईतील सायबर पोलिसांच्या पूर्व प्रादेशिक सायबर पोलीस ठाण्याचे चित्र विदारक असणे, सायबर कक्षात प्रवेश करताच सर्वत्र गळती, दुर्गंधी अस्वच्छता दिसत असणे, त्याच अवस्थेत अधिकारी, कर्मचारी आउटडेटेड झालेल्या कॉम्प्युटरवर काम करित असणे, आवश्यक यंत्रणा नसल्यामुळे सायबर कक्षात काम करण्यासाठी अधिकारी उत्सुक नसणे, अपुऱ्या यंत्रसामुग्रीमुळे सायबर गुन्ह्यांची उकल करण्यात मुंबई पोलिस कमी पडत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येणे, सायबर पोलिसांनी कामाची गती वाढविण्याची आवश्यकता, गेल्या वर्षभरात २,८८३ गुन्ह्यांची नोंद झाली, त्यापैकी अवघ्या ४५५ गुन्ह्यांची उकल करण्यात येणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सायबर गुन्ह्यांत होत असलेली वाढ रोखण्याकरिता शासनाने ठोस पावले उचलण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने सत्वर कार्यवाही करण्याची गरज, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

अप्रकाशित प्रत

(५) **श्री.गोपिचंद पडळकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पशुसंवर्धन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात मेंढपाळ बांधवांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून नाहक त्रास बांधवांना सहन करावा लागत असणे, महाराष्ट्र मध्ये गेली अनेक वर्ष धनगर समाज आपला पारंपारिक मेंढीपालन व्यवसाय करून आपली उपजीविका चालवत असणे, या व्यवसायामुळे मेंढपाळ बांधव महाराष्ट्रभर भटकंती करत असणे, परंतु गेल्या काही काळामध्ये मेंढपाळ आणि वन खात्याचे अधिकारी तसेच गावगुंडांमध्ये सातत्याने संघर्षाची परिस्थिती उद्‌भवत असणे, मेंढपाळांना जंगली चराई साठी खुली करणे, धरण बुडीत क्षेत्र खुले करणे, वृक्ष लागवडीस पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर वनीकरणाच्या जमिनीसाठी खुल्या करणे, १००-१०० वर्षापासून लाभक्षेत्र मध्ये मेंढपाळ वास्तव्यास असून त्यांना वन अधिकाऱ्यांकडून नाहक त्रास सहन करावा लागत असणे,गायरानावरती अतिक्रमण झाल्यामुळे मेंढ्याच्या साठी जमिनी शिल्लक राहिल्या नसणे, तरी ती अतिक्रमण काढणे, तसेच पावसाळ्यात दूषित पाणी पिल्याने व रस्ते अपघातात शेळया मेंढ्या मरण पावतात अशावेळी नैसर्गिक आपत्ती घोषित करून मेंढपाळांना आर्थिक भरपाई देण्यात यावी, अशा अनेक मागणी राज्यातील मेंढपाळ बांधवांच्या शासनाकडे असणे, उक्त मागण्याच्या अनुषंगाने योग्य उपाययोजना करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी २६ जुलै, २०२२ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्याकडे केलेली असणे या मागणीच्या अनुषंगाने शासनाने तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर,** प्रविण दरेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्य दूध महासंघ मर्यादित, मुंबई (महानंद दुग्धशाळा) हि संस्था दुग्धव्यवसायातील व सहकार क्षेत्रातील नोंदणीकृत शिखर संस्था असणे, महानंद दूध व दुग्धपदार्थांची विक्री मुंबई महानगर क्षेत्रातील मुख्य शहरांच्या बाजारपेठेमध्ये होत असून सन २००४-०५ पर्यंत सुमारे ०८ लक्ष लिटर प्रतिदिन विक्रीचा उच्चांक गाठला असणे, तद्‌नंतर माहे जानेवारी २०२१ पर्यंत विक्रीमध्ये कमालीची घट होऊन ती १.४ लक्ष लिटर (सर्व युनिटसह) प्रतिदिन इतकी झालेली असणे, विद्यमान लोकनियुक्त संचालक मंडळ आल्यानंतर दुधाचे खरेदी दर वाढवून घेण्यासाठी कृत्रिम दूध टंचाई निर्माण करून दूध खरेदी दरवाढ करून घेण्यात येणे, यामुळे बाजारपेठेत महानंद दुधाचे दर वाढणे, परिणामी दुधाच्या विक्रीवर परिणाम

अप्रकाशित प्रत

झाल्यामुळे दूध महासंघाला मोठ्या प्रमाणात तोटा सहन करावा लागणे, सन २०१६-१७ मध्ये ७.७३ कोटी, सन २०१७-१८ मध्ये १.२८ कोटी इतका तोटा झाला असणे, सन २०१८-१९ या वर्षात चुकीच्या पद्धतीने रु. १ लक्ष नफा दाखविला असल्याची बाब निदर्शनास येणे, तसेच सन २०१९-२० या वर्षात दुधाचा दर रु. ३६ इतका असल्यामुळे रु. ५० कोटी इतका तोटा होणार असल्याची बाब समोर येणे, सध्या डिसेंबर २०२० पर्यत महासंघाने रु. ४५ कोटीचा ओवर ड्राफ्ट काढून कारभार सुरु ठेवला असल्याचे निदर्शनास येणे, सन २०१८ मध्ये शेतकऱ्यांपुढे अतिरिक्त दुधाचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्र शासनाने दूध भुकटी व दुग्धजन्यपदार्थ रूपांतरणासाठी रु. ५ प्रती लिटर अनुदान देण्याचा निर्णय घेणे, परंतु सदर शासन निर्णयात पिशवी बंद दुधाला अनुदान नसतानाही संचालक मंडळाने चुकीच्या पद्धतीने ठराव पारित करून रु. २८ कोटी पिशवी बंद दुधाला अनुदान वाटप केले असल्याची बाब समोर येणे, सदर ठराव पारित करताना दूध महासंघास होणाऱ्या आर्थिक तोट्यास संचालक मंडळ जबाबदार राहणार नसून शासन जबाबदार राहील अशा आशयाचा ठराव पारित करण्यात येणे, परंतु शासनाकडून सदरचा निधी नामंजूर करण्यात येणे, यामुळे दूध महासंघास अधिकचा तोटा सहन करावा लागणे, दूध महासंघास होणाऱ्या तोट्यामुळे संस्थेवर अवलंबून असणाऱ्या कामगारांचे वेतना व्यतिरिक्त इतर देणी थकले असणे, परिणामी कामगारांमध्ये भितीचे वातावरण पसरले असून शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, एम.एस.सी. सहकारी बँकेवर प्रशासक नेमल्यानंतर बँकांची आर्थिक स्थिती सुधारली असणे, याच धर्तीवर दूध महासंघांवर देखील प्रशासक नेमण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

(७) **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, अब्दुल्ला खान दुर्राणी, अमरनाथ राजूरकर, अंबादास दानवे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सन २०१४ साली राज्य शासनाने गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुका क्रिडा संकुलासाठी १ कोटी ५ लक्ष रुपयांचा निधी मंजुर करुन सदर काम हे १२ टक्के कमी दराने मे.युनाइटेड कन्सट्रक्शन, औरंगाबाद यांना देण्यात आले असणे, सदर कामात संरक्षण भिंत रु.९.०० लक्ष मीटर ऐवजी ४०० मीटर ट्रॅक रु. ८.०० लक्ष बॅडमिंटन हॉल कोटींग रु. ३.०० लक्ष ८८ हजार असे एकुण रु. १,०६,१७,३७७ कार्यारंभ आदेश देण्यात आले तसेच सदर काम हे बारा महिने मुदतीचा आत करण्याबाबत संबंधीत ठेकेदारास आदेशित करण्यात आले असणे, सदर कामाचे कार्यारंभ आदेश देऊन

आज तारखेपर्यंत ८ वर्षे उलटून गेल्यानंतर देखील सदर क्रिडा संकुलाचे काम अपूर्ण स्वरुपात असून या संदर्भात जनतेच्या वाढत्या तक्रारी असणे, क्रिडा संकुल समितीची बैठक दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजी घेण्यात आली व या बैठकीत सदर क्रिडा संकुलाच्या आतापर्यंत झालेल्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला असणे, त्यानुसार झालेला संपूर्ण कामाचे संयुक्त मोजमाप पाहणी अहवाल घेणेबाबत बैठकीत सर्वानुमते मान्यता दिली होती. त्यानुसार सदर समितीने दिनांक ०४ ऑगस्ट, २०२१ रोजी पाहणी अहवाल दिला असून सदर अहवालानुसार मंजूर कार्यारंभ आदेशानुसार मंजूर रु. ८५,२९,१७२ तसेच वाढीव कामाची रक्कम रु.२० लक्ष ८८ हजार असे एकत्रित रु. १,०६,१७,३७७ एवढी रक्कम कामासाठी मंजूर करण्यात आलेली होती, यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधीत ठेकेदारास रु. ९७.०० लक्ष अदा केले असणे, मात्र सदर क्रिडा संकुलात मंजूर असलेले खो-खो ग्राऊंड, बास्केटबॉल कोर्ट, अंतर्गत रस्ते, सार्वजनिक शौचालय यासह इतर अनेक कामे झालेली नसणे, तसेच झालेली कामे ही देखील अपूर्ण असणे, परंतू सदर कामाचे बिल अधिकारी व ठेकेदार यांचे संगनमताने काढले असल्याने संबंधीत अधिकारी व ठेकेदार यांचेवर कारवाई करण्यासाठी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(८)** **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाने केंद्रीय औद्योगिक नीतीचा पुरेपूर फायदा घेण्यात येऊन भांडवलदारांना प्रचंड सवलती देऊन औद्योगिक गुंतवणुकीला प्रोत्साहित करणे, उद्योगांना स्वस्तात मजूर व स्वस्तात कच्चा माल मिळावा यासाठी शेतकऱ्यांवर शेतमालाला कधीही जिल्हाबंदी, राज्यबंदी तर कधी निर्यातबंदी सारखे अत्यंत अन्यायकारक नियंत्रण लादणे, जमीन धोरणाचे नियंत्रण आणणे, परिणामी शेतातून होणाऱ्या उत्पन्नावर नुकसान होऊन शेतकऱ्यांवर कर्जाचे डोंगर निर्माण होणे, हरितक्रांतीमुळे कृषी क्षेत्रात उत्पादक प्रचंड प्रमाणात वाढले, मात्र राज्य शासनाच्या सापत्न आर्थिक नीतीमुळे या शेती उत्पन्नातून उत्पन्न निर्माण झाले नाही पण कर्ज निर्माण होणे, परिणामी राज्यातील शेतकरी आगतिकतेने कर्जबाजारी होऊन आत्महत्याच्या उंबरठ्यावर पोहोचणे, राज्यात दररोज कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करीत असणे, त्यामुळे शासनाने यापुढे नव्याने शेती निधी जाहीर करून तिची परिणामकारक अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक असताना याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व

अप्रकाशित प्रत

नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीची कारवाई व उपाय योजना करण्याची निर्माण झालेली आवश्यकता व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

(९) **श्री.अभिजित वंजारी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीमध्ये अनेक बाबतीत विदर्भाचा अनुशेष अजूनपर्यंत पूर्णत: दूर करण्यात न येणे, विशेषत: औद्योगिकीकरणाच्या दृष्टीकोनातून व पर्यायाने रोजगार निर्मितीच्या दृष्टीकोनातून विदर्भात मोठया प्रमाणात अनुशेष असणे, त्यामुळे विदर्भातील सर्व जिल्ह्यात मोठया प्रमाणात बेरोजगारी पसरणे, त्यामुळे अनेक तरुण-तरुणी नैराश्यात असल्याचे दिसून येणे, राज्यात औद्योगिकीकरणामध्ये मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद इतर काही विभाग सक्षम झाले असून त्यामुळे त्या त्या विभागाच्या विकासाला मोठया प्रमाणात चालना मिळणे, परंतु विदर्भात उद्योगाचे प्रमाण कमी असल्यामुळे या भागात स्थानिक विकासाला त्याप्रमाणात चालना न मिळणे, म्हणून राज्याच्या सर्वच विभागामध्ये विकासाचा समतोल साधून विदर्भात औद्योगिकीकरणाचे प्रमाण वाढविण्यासाठी नवीन औद्योगिक धोरण स्वीकारण्याची गरज लक्षात घेता या भागात मिहान आणि एम.आय.डी.सी.च्या जागा उद्योग क्षेत्रातील कंपन्याना देण्यासंबंधी नियम आणि दर यामध्ये सूट दिल्यास या भागात उद्योग वाढण्यास उत्तेजन मिळणे, तसेच औद्योगिक क्षेत्राला लागणारी, वीज, पाणी आणि इतर संसाधन यामध्ये सुध्दा राज्याच्या इतर विभागाच्या तुलनेमध्ये सूट दिल्यास अनेक राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्या विदर्भात आपले उद्योग स्थापण्यासाठी आकर्षित होईल, यासाठी राज्यामध्ये औद्योगिकीकरणाच्या बाबतीत समतोल साधण्यासाठी आणि विदर्भातील विकासाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी आणि बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यासाठी विदर्भासाठी विशेष औद्योगिक धोरण अवलंबविण्याबाबत तातडीने कार्यवाही करणे आवश्यक असतानाही याबाबत शासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

## - मध्यंतर —

**सहा : सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा — (पहिला दिवस).**

**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

**१.** महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री

**२.** वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री

**३.** उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री

**४.** आदिवासी विकास मंत्री

**५.** ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री

**६.** पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

**७.** अन्न व औषध प्रशासन मंत्री

**८.** शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री

**सात : शासकीय विधेयके —**

**(१) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विधेयक विचारात घेणे.**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२२."

**(२) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२२."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतिश चव्हाण, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२२ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

अग्रिम प्रत

**आठ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**सर्वश्री गोपिचंद पडळकर,** रामराव पाटील, रमेश कराड, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात राज्य कीटक शास्त्रज्ञ या पदावर शैक्षणिक अर्हता नसलेल्या व्यक्तीची चुकीच्या पद्धतीने निवड करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असणे, नियुक्त झालेल्या अधिकारी यांची नियुक्ती शासनातील तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील काही अधिकाऱ्यांशी संगनमत करुन झाली असल्याच्या तक्रारी अनेक तक्रारदारांनी केलेल्या असणे, संचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे येथील राज्य कीटक शास्त्रज्ञ यांचे शैक्षणिक अर्हता त्यांच्या पदाकरिता अनुरूप नसून या प्रकरणाची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, सहाय्यक संचालक हिवताप, कोल्हापूर यांनी मा. सार्वजनिक आरोग्यमंत्री यांना दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ रोजी निवेदन दिलेले असणे, सदर निवेदनाच्या अनुषंगाने राज्य कीटक शास्त्रज्ञ या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता नसलेल्या व्यक्तीची चुकीच्या पद्धतीने निवड केलेल्या संबंधितांची चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २१ ऑगस्ट, २०२२

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

अप्रकाशित प्रत